# पालकांचे वेतन एकमेव निकष नाही

## क्रिमी लेअरबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे ओबीसी विद्यार्थ्यांना दिलासा

**नवी दिल्ली–** सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी ओबीसी क्रीमी लेयर निश्चित करण्याच्या प्रकरणात म्हटले की, केवळ पालक किंवा पालकांच्या पगाराच्या आधारावर कोणाचीही श्रेणी निश्चित केली जाऊ शकत नाही. पालक किंवा पालकांचे पद आणि स्थिती देखील विचारात घेतली पाहिजे. न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा आणि न्यायमूर्ती आर महादेवन यांच्या खंडपीठाने या निर्णयात केंद्र सरकारच्या त्या अपीलांना फेटाळून लावले, ज्या उच्च न्यायालयाच्या निर्णयांविरुद्ध होत्या.

न्यायालयाने त्या ओबीसी उमेदवारांना मोठा दिलासा दिला आहे, ज्यांना नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होऊनही नोकरी मिळाली नव्हती. सरकारने त्यांच्या पालकांच्या पगाराला आधार मानून त्यांना क्रीमी लेयरच्या श्रेणीत टाकले होते. न्यायालयाने स्पष्ट केले की, अधिकाऱ्यांनी उमेदवारांना आरक्षणातून वगळण्यासाठी चुकीचा निकष वापरला. हा संपूर्ण वाद त्या उमेदवारांशी संबंधित आहे ज्यांचे पालक सार्वजनिक क्षेत्र (पीएसयू), बँक किंवा अशाच प्रकारच्या संस्थांमध्ये काम करत होते. सरकारने २००४ च्या एका स्पष्टीकरण पत्राचा आधार घेऊन उमेदवारांच्या पालकांच्या पगाराला उत्पन्नात समाविष्ट केले होते. यामुळे उमेदवार आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिले होते. सर्वोच्च न्यायालयाने १९९३ च्या सरकारी आदेशाचा संदर्भ दिला. हा आदेश इंदिरा साहनी प्रकरणानंतर तयार करण्यात आला होता. यात स्पष्ट आहे की, क्रीमी लेयर निश्चित करण्यासाठी पालकांचे पद (उदा. गट अ किंवा गट ब अधिकारी) मुख्य आधार आहे. या नियमानुसार पगार आणि शेतीतून मिळणारे उत्पन्न ,उत्पन्न/मालमत्तेत समाविष्ट केले जात नाही. न्यायालयाने म्हटले की, २००४ चे एक पत्र मुख्य धोरण बदलू शकत नाही. न्यायालयाने हे देखील नमूद केले की सरकारी कर्मचारी आणि पीएसयू कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करणे चुकीचे आहे. जर सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांना पदाच्या आधारावर सूट मिळत असेल, तर पीएसयू कर्मचाऱ्यांच्या मुलांना केवळ पगाराच्या आधारावर आरक्षणातून वगळणे समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन आहे. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला आदेश दिला आहे की, त्यांनी ६ महिन्यांच्या आत या उमेदवारांच्या दाव्यांवर पुन्हा विचार करावा. न्यायालयाने असेही म्हटले आहे की, जर आवश्यक असेल तर या उमेदवारांना नोकरी देण्यासाठी स्वतंत्र पदे निर्माण करावीत.

# विधानभवन बॉम्बने उडवून देण्याची धमकी

## राज्य सरकारकडून धमकीची गंभीर दखल; विधानभवन परिसरात सुरक्षेत वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना विधानभवनची इमारत बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे आल्याने गुरुवारी विधानभवन परिसरात खळबळ उडाली. या धमकीचे पडसाद विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात उमटून याप्रकरणी सरकारने निवेदन देण्याची मागणी करण्यात आली. तर धमकीची गंभीर दखल घेत राज्य सरकारने विधानभवन परिसराच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ केली. आज विधानभवन परिसरात अभ्यगतांच्या प्रवेशावर निर्बंध आणले होते.

मुंबईतील विधानभवनसह मुंबई उच्च न्यायालय, बीएसई आणि मेट्रो रेल्वेला बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे आल्याची धक्कादायक माहिती आज समोर आली. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना या माहितीला दुजोरा दिला. आज सकाळी ६ वाजून ५७ मिनिटांनी विधानभवनाच्या अधिकृत ई-मेलवर धमकी देण्यात आली. अशी धमकी देणाऱ्या ई-मेलचा संबंध खलिस्तान समर्थकांशी असू शकतो. मात्र, यावर तातडीने भाष्य केल्यास ते घाई केल्यासारखे होईल. या मेलमध्ये बॉम्ब आणि क्षेपणास्त्राचा उल्लेख आहे. त्यामुळे या प्रकरणाची संपूर्ण चौकशी झाल्यानंतरच अधिकची माहिती देणे संयुक्त होईल, असे प्रा. शिंदे यांनी सांगितले. विधान परिषदेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी विधानभवनाला मिळालेल्या धमकीचा मुद्दा उपस्थित केला. धमकीच्या पार्श्वभूमीवर सभागृहाचे कामकाज स्थगित करून विधानभवन इमारतीची संपूर्ण तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नार्वेकर यांनी केली. तर या धमकीबाबत राज्य सरकारने सभागृहात निवेदन करावे, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या अनिल परब यांनी केली.

विधानसभेत काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी विधानभवनला मिळालेल्या धमकीचा मुद्दा उपस्थित केला. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असतानाच अशा प्रकारची धमकी येणे ही चिंतेची बाब असल्याचे सांगत वडेट्टीवार म्हणाले, हा ई-मेल कोणी पाठवला? त्यामागे कोणती शक्ती आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. खलिस्तानी संघटनेचा हात असल्याची चर्चा सुरू आहे. जर अशा महत्त्वाच्या ठिकाणांना उडवून देण्याच्या धमक्या येत असतील तर हे आपल्या गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे का? असा सवाल त्यांनी केला. सध्या अमेरिका आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धाचा या धमकीशी सबंध आहे का? आंतरराष्ट्रीय पातळीवर ताणले गेलेल्या संबंधांमुळे भारतात दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचा हा प्रयत्न असू शकतो.गृह विभागाने या प्रकरणाचा तपास करून या ई-मेलचा उगम शोधून काढावा आणि यावर राज्य सरकारने तातडीने सभागृहात निवेदन करावे, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली.

**बॉम्बशोधक पथक दाखल**

दरम्यान, विधानभवनला धमकीचा ई-मेल मिळाल्यानंतर विधानभवनात तातडीने बॉम्बशोधक पथक दाखल झाले. या पथकाने विधानभवन परिसराची तपासणी केली. मात्र, तपासणी काहीही आढळून आले नसल्याची माहिती विधानभवनातील एका पोलीस अधिकाऱ्याने दिली.

# ११२ नंबरवर कॉल केल्यानंतर मन:स्ताप

**नेवासा–** नेवासा शहरातील एका व्यक्तीने ११२ नंबरवर अवैध धंद्याविरोधात तक्रार केली त्यानंतर मात्र त्या व्यक्तीला नेवासा पोलीस ठाण्यातूनच एका कर्मचाऱ्याचा फोन आला. त्याने तक्रार देणाऱ्याचे नाव उघड केले. त्यातून तक्रारदारालाच मोठ्या मनःस्तापाला सामोरे जावे लागल्याची घटना नुकतीच घडली.

त्याचे असे झाले,ज्या ठिकाणची माहिती या व्यक्तीने दिली होती त्या ठिकाणी किरकोळ कारवाई करण्यात आली आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याशी संपर्क साधला असता एक तास होऊनही अवैध धंद्याच्या ठिकाणी कोणी आले नाही. तक्रारदार व्यक्तीचा तक्रारी कॉल प्रथम नवी मुंबईतील केंद्राला जातो. तेथे तक्रारीसंदर्भात संपूर्ण माहिती घेऊन तो कॉल संबंधित जिल्ह्याला पाठविला जातो. तक्रार पाहून त्यावेळी तेथून जवळ असलेल्या पोलीस मार्शलला त्याची माहिती पाठविली जाते. मार्शल कॉल्सची पूर्तता करुन त्याची माहिती दिली जाते. ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पार पडते. ११२ हा आपत्कालीन नंबर अमेरिकेच्या ९११ या हेल्पलाईन नंबरसारखा आहे. इमरजेंसी रिस्पॉन्स सपोर्ट सिस्टम यांच्या अंतर्गत ही हेल्पलाईन सुरु करण्यात येणार आहे. यापूर्वी आपल्या पोलिसांच्या मदतीसाठी १०० नंबर, महिला हेल्पलाईनसाठी १०९१ आणि चाईल्ड हेल्पलाईनसाठी १०९८ हे नंबर उपलब्ध होते. ११२ या नंबरवरुन मदत मागितल्यास घटनास्थळाजवळ गस्त घालणाऱ्या जीपीएस यंत्रणेवर त्यांची माहिती जाईल. याद्वारे तक्रारदाराला कमीत कमी वेळात मदत केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते पण प्रत्यक्षात तसे घडत नसल्याचे समोर आले आहे.

# दिवटे येथे फ्रिजच्या स्फोटामुळे घराला भीषण आग

## लग्नासाठी आणलेल्या साहित्यांसह लाखोंचा ऐवज जळून खाक

**बोधेगाव (वार्ताहर)–** शेवगाव तालुक्यातील दिवटे येथील रामनगर परिसरात विजेच्या शॉर्टसर्किटमुळे फ्रिजचा स्फोट होऊन घराला भीषण आग लागल्याची घटना गुरुवारी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीत घरातील संसारोपयोगी वस्तूंसह लग्नासाठी खरेदी करून ठेवलेले किराणा साहित्य, कपडे तसेच सुमारे दीड लाख रुपयांची रोख रक्कम जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर येथील ऊसतोडणी कामगार दत्तू रतन सांगळे यांच्या राहत्या घरात गुरुवारी रात्री अचानक विजेच्या शॉर्टसर्किटमुळे फ्रिजमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर काही क्षणातच घरात आग लागून ती झपाट्याने पसरली. घरात मोठ्या प्रमाणात ज्वलनशील साहित्य असल्यामुळे आगीने काही वेळातच भीषण रूप धारण केले.

या आगीत घरात साठवून ठेवलेले लग्नासाठीचे किराणा साहित्य, नवीन कपडे, रोख रक्कम तसेच फर्निचर, भांडी, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि इतर संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले. सांगळे कुटुंबीयांनी लग्नासाठी केलेली सर्व तयारी या आगीत भस्मसात झाल्याने कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थांच्या मदतीने काही वेळानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनेची माहिती बोधेगाव पोलिस दूरक्षेत्राला देण्यात आल्यानंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या घटनेमुळे रामनगर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, घटना घडल्यानंतर वीज वितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तसेच वीजपुरवठा खंडित करण्यासाठी सुमारे अर्ध्या तासाचा कालावधी लागल्याने वीज वितरणाच्या गलथान कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# डोक्यात काचेचा ग्लास मारल्याने तरुण जखमी; एकावर गुन्हा दाखल

**राहुरी (प्रतिनिधी)–** कामाचे पैसे दिले नाही म्हणून आरोपीने तरुणाच्या डोक्यात काचेचा ग्लास मारुन जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील धामोरी फाटा येथे घडली आहे.

दत्तू गिताराम जाधव हा तरुण वेल्डर असून तो राहुरी तालुक्यातील धामोरी येथे रहावयास आहे.. ७ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजे दरम्यान दत्तू जाधव व त्याचे मित्र आमित जाधव, दादा पोपळघट हे तिघेजण धामोरी फाटा येथील हॉटेलमध्ये चहा घेत होते. त्यावेळेस आरोपी तेथे आला व दत्तू जाधव यास म्हणाला की, माझ्या कामाचे राहीलेले पैसे दे, तेव्हा दत्तू जाधव त्याला म्हणाला की, दोन-तीन दिवसांनी देतो, आता माझ्याकडे नाहीत. असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपीने टेबलवर असलेला काचेचा ग्लास दत्तू जाधव याच्या डोक्यात मारुन जखमी केले. त्यानंतर जर माझे पैसे दिले नाहीतर तुला जिवेच मारुन टाकीन, अशी धमकी देवून शिवीगाळ केली. दत्तू जाधव याच्या फिर्यादीवरून राजू रमेश ससाणे, रा. धामोरी याच्यावर गु.र. नं. २१९/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५१ (२), ३५२ प्रमाणे शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात २१ कारखान्यांचा गळीत हंगाम संपला; एकच कारखाना सुरू

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** नगर जिल्हा साखर कारखान्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. दरवर्षी येथे साखरेचे विक्रमी उत्पादन होते. यंदाच्या गळीत हंगामात जिल्ह्यातील २२ कारखाने सुरू होते. त्यात १४ सहकारी साखर कारखान्यांचा समावेश होता. मार्च महिनाअखेर हंगाम चालेल, असा अंदाज होता. मात्र, गंगामाई वगळता सर्व २१ कारखान्यांचा गळीत हंगाम आटोपला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ कोटी १५ लाख ४३ हजार ९६५ मेट्रिक टनाचे गळीत झाले. त्यातून १ कोटी २ लाख ९९ हजार ८३५ क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन झाले. जिल्ह्याने ८.९२ टक्के सरासरी उतारा राखला आहे.

यंदाच्या हंगामात २२ कारखान्यांनी गळीत हंगाम केला. त्यातील नऊ कारखान्यांना दहा किंवा त्यापेक्षा जास्त साखर उतारा राखण्यात यश मिळाले. अकोल्याच्या अगस्ती साखर कारखान्याने सर्वाधिक ११.२७ टक्क्यांचा उतारा घेतला आहे. त्याखालोखाल कर्मवीर शंकरराव काळे साखर कारखान्याने जिल्ह्यात सर्वाधिक उतारा घेतला. हळगावच्या (जामखेड) बारामती ॲग्रोनेही अकरावर उतारा घेतला आहे. क्रांती शुगर, वृद्धेश्वर, श्रीगोंदे, प्रसाद या कारखान्यांनीही दहा टप्पा ओलांडला. जिल्ह्याने सव्वा कोटी साखरेचा टप्पा ओलांडला आहे. जिल्ह्यात गाळपात इंडिकॉनने आघाडी घेतली आहे. १४ लाख १० हजार ६१ मेट्रिक टन उसाचे गळीत केले आहे. त्यातून १० लाख ८१ हजार ५०० क्विंटल पोत्यांचे उत्पादन घेतले आहे. भेंडा येथील घुले कारखान्यानेही १० लाख टनांचे गाळप केले आहे. त्यांना ९ लाख ३१ हजार साखर पोती उत्पादन मिळाले आहे. विखे, थोरात, गौरी शुगर, काळे आदी कारखान्यांचेही चांगले गळीत झाले आहे.

# राहाता बाजार समितीत सोयाबीन ५३५० रुपये

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत गुरुवारी सोयाबीनला जास्तीत जास्त ५३५० रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाला. सोयाबीनच्या १७ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला सरासरी ५३५० रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाला. हरभऱ्याची तीन क्विंटलची आवक झाली.

हरभऱ्याला सरासरी ५१५० रुपये भाव प्रतिक्विंटलला मिळाला. गव्हाची ३६ क्विंटलची आवक झाली. गव्हाला २२४५ रुपये ते २२६९ रुपये भाव मिळाला तर सरासरी २२६० रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# पुढील पाच दिवस नगरसह राज्यात अवकाळीचा शिडकाव

## ढगाळ वातावरणासहित पावसाची शक्यता

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** मुंबईसह कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रात शुक्रवार १३ ते मंगळवार १७ मार्चपर्यंतच्या पाच दिवसात ढगाळ वातावरण राहून तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता आहे. यात विशेष करून रविवार दि. १५ आणि सोमवार दि.१६ मार्चरोजी नगरसह राज्यातील २८ जिल्ह्यात तुरळक ठिकाणी गडगडाटीसह पावसाची शक्यता आहे.

राज्यातील अवकाळी पावसाबाबत पुण्याचे हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले. की राज्यात विशेषतः रविवार-सोमवार १५-१६ मार्च या दोन दिवशी महाराष्ट्रातील संपूर्ण विदर्भ- मराठवाड्यासह धुळे, जळगाव, नाशिक, पुणे, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या २८ जिल्ह्यात तुरळक ठिकाणी गडगडाटी स्वरूपाच्या किरकोळ पावसाची शक्यता आहे. मुंबईसह कोकणात मात्र या वातावरणाचा प्रभाव जाणवणार नाही. गुरूवार दि. १२ पासून आजपासुन उद्या शनिवार १४ मार्चपर्यत महाराष्ट्रातील अलिबाग, डहाणू, जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अकोला, अमरावती, ब्रम्हपुरी, बुलढाणा येथे उष्णतेची लाट किंवा उष्णतेच्या लाटेसदृश्य स्थिती जाणवेल. रविवार १५ मार्चपासून मात्र महाराष्ट्रात ४-५ दिवस दुपारच्या कमाल तापमानात काहीशी घसरण होवून उन्हाची ताप व दमटपणा कमी जाणवेल असे खुळे सांगितले.

# संगमनेर जिल्हा निर्मितीचा प्रस्ताव तातडीने समितीसमोर ठेवा

## आमदार अमोल खताळ यांची अर्थसंकल्पीय अधिवेशनात मागणी

**संगमनेर (तालुका प्रतिनिधी)** – अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन करून संगमनेर जिल्ह्याची निर्मिती करण्याचा प्रस्ताव तातडीने विशेष समिती समोर ठेवून त्यावर लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली. यासोबतच तालुक्यात सुरू असलेल्या अवैध गौणखनिज उत्खननावर कडक कारवाई करावी. याचबरोबर तलाठी, मंडलाधिकारी आणि भूमी अभिलेख कार्यालयांच्या इमारतींवर अतिरिक्त मजले बांधण्यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करावी, अशी मागणीही त्यांनी शासनाकडे केली.



अहिल्यानगर जिल्ह्याचे विभाजन करून संगमनेर जिल्हा करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने केली जात आहे. या मागणीसाठी अनेकवेळा आंदोलने सुद्धा करण्यात आले आहे. सन २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या विषयावर सकारात्मक चर्चा झाली होती. मात्र त्यानंतरही जिल्हा विभाजनाचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे राज्य शासनाने संगमनेर जिल्हा निर्मिती संदर्भातील प्रस्ताव तातडीने विशेष समिती समोर ठेवून त्यावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार खताळ यांनी विधिमंडळात करत याकडे सरकारचे लक्ष वेधले.

याचबरोबर तालुक्यात अनेक वर्षांपासून अवैध गौणखनिज उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा मुद्दाही आमदार खताळ यांनी विधानसभेत उपस्थित केला. प्रशासनाकडून गौणखनिजाची वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली असल्याचे कागदोपत्री दाखवले जात असले तरी प्रत्यक्षात अनेक कारवाया केवळ कागदावरच राहिल्या असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत अनेक कारवायांमध्ये दंड ठोठावण्यात आला असला तरी त्या दंडाची वसुली महसूल विभागाकडून प्रभावीपणे होत नाही. त्यामुळे अवैधरित्या गौणखनिज वाहतूक करणाऱ्यांवर केवळ दंड ठोठावून थांबू नये, तर त्यांच्या मालमत्तेवर दंडाची रक्कम टाकून वसुलीची प्रक्रिया राबवावी. तसेच अवैध गौणखनिज उत्खननावर कडक आणि परिणामकारक कारवाई करून हा प्रकार पूर्णपणे थांबवावा, अशीही मागणी त्यांनी मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांकडे केली आहे.

## पान १ वरुन

### मानवी वस्तीत शिरलेले...

ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही नाईक यांनी सांगितले. जेरबंद केलेले वाघ, बिबटे आणि इतर हिंस्र वन्य प्राण्यांना ठेवण्यासाठी सद्यःस्थितीत अस्तित्वात असेलल्या रेस्क्यु सेंटरची क्षमता वाढवण्यात येत आहे. तसेच केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाची परवानगी घेऊन बिबट्यांना इतर राज्यातील प्राणी संग्रहालय आणि नव्य प्राणी बचाव केंद्रामध्ये हस्तांतरित करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याची माहिती गणेश नाईक यांनी यावेळी दिली.

### ग्रामीण भागात आता...

यापूर्वी देशभरात सिलेंडर बुकिंगसाठी २१ दिवसांचा कालावधी निश्चित होता, जो अलीकडे २५ दिवसांपर्यंत वाढवण्यात आला होता. आता ग्रामीण आणि शहरी, या दोन्ही भागांसाठी वेगवेगळी कालमर्यादा ठरवण्यात आली आहे. या निर्णयामुळे गॅस पुरवठ्यावर अचानक पडणारा दबाव कमी होण्यास मदत होईल.

**अफवांमुळे वाढली होती घाईघाईची बुकिंग**

गॅस टंचाईच्या अफवांमुळे अनेक ग्राहक गरजेपेक्षा आधीच सिलेंडर बुक करू लागले होते. जे ग्राहक आधी सुमारे ५५ दिवसांनी सिलेंडर बुक करत होते, ते आता फक्त १५ दिवसांच्या अंतराने बुकिंग करू लागले होते. यामुळे साठेबाजी आणि काळाबाजाराची शक्यता वाढली होती. याच पार्श्वभूमीवर बुकिंगमधील अंतर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे.

**देशात एलपीजीची कमतरता नाही**

एलपीजी संकटाच्या चर्चांवर प्रतिक्रिया देताना हरदीप पुरी यांनी सांगितलं की, गेल्या पाच दिवसांत एलपीजी उत्पादनात २८ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. ३३ कोटी भारतीय कुटुंबांच्या स्वयंपाकघरात गॅसची कमतरता भासू नये ही सरकारची प्राथमिकता असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

### गॅस टाक्या वितरणासाठी...

डॉ. लक्ष्मण इंगळे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे गॅस वितरणासाठी पोलीस संरक्षणाच्या मागणीचे निवेदन दिल्याचे सांगितले. गॅस वितरकांनी वैयक्तिक निवेदनही दिलेली आहेत. अशी निवेदने प्राप्त झाल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांनी सांगितले. शहरातील युनिटेक गॅस एजन्सीचा गॅस टाक्या वितरणासाठी चाललेला टेम्पो टोळक्याने अडवण्याचा प्रकार आज सकाळी घडला. या संदर्भात तोफखाना पोलिसांकडे तक्रार करण्यात आल्याची माहिती एजन्सीच्या संचालक विजया फटांगरे यांनी सांगितले. टेम्पो अडवणारे ग्राहक नव्हते तर टोळके होते, पाईपलाईन रस्ता भागातील एकविरा चौकाजवळ ही घटना घडली. एजन्सीच्या वडगाव येथील गोदामातून निघालेला टेम्पो टोळक्याने अरेरावी व शिवीगाळ करत अडवला व गॅस टाक्यांची मागणी केली. पोलिसांना दूरध्वनी केल्यानंतर टोळके पसार झाले. याशिवाय गॅस टाकी वितरणातील विस्कळीतपणामुळे गॅस एजन्सीचे कर्मचारी व ग्राहकांमध्ये वादावादीच्या घटनाही घडू लागल्या आहेत.

गॅस वितरण सुरळीत असून अफवांमुळे आगाऊ नोंदणीमध्ये वाढ झाली आहे, साठा करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. व्यावसायिक टाक्या बंद झाल्यामुळे व्यवसाय करणारे घरगुती टाक्यांचा वापर करू लागले आहेत. त्यातून अडचणी निर्माण झाल्या आहेत. ग्राहकांनी मकेवायसीफ्ची पूर्तता करावी यासाठी गेल्या वर्षभरापासून जनजागृती केली जात होती. आता वितरण्यासाठी केवायसी बंधनकारक केल्याने अनेकांना त्याची अडचण भासत आहे. त्यातून अफवा निर्माण होत आहेत. ग्राहकांशी वाद होण्याच्या घटना घडत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील गॅस वितरकांनी पोलीस संरक्षणाची मागणी केल्याचे संघटनेच्यावतीने सांगण्यात आले.

### सरकारी जनावरांचे दवाखाने...

दिसणे, दूध उत्पादन कमी होणे, मंद हालचाल, शेण व मूत्रातील बदल ही आजारपणाची लक्षणे लक्षात आल्यानंतर तत्काळ उपचारासाठी पशुवैद्यक उपलब्ध व्हायला हवेत. मात्र, राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या वेळा १९९६ ते २०२१ पर्यंत सकाळी सात ते दुपारी १२ व दुपारी चार ते सायंकाळी सहा अशा होत्या. तर जानेवारी २०२१ पासून त्यात बदल करून सकाळी नऊ ते दुपारी साडेचार असा करण्यात आला. मात्र, शेतकरी, पशुपालक व शेतमजुरांच्या कामाच्या वेळा व पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कामकाजाच्या वेळा यांचा ताळमेळ बसत नसल्याने पशुधनावरील प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सेवेला मर्यादा आली. परिणामी आरोग्य सेवेची संख्या कमी झाल्याचे गेल्या पाच वर्षांच्या आकडेवारीवरून दिसून येते.

**पशुजन्य उत्पादनाचा वाटा केवळ २.८ टक्के**

राज्यात शेती व्यवसायाला जोडधंदा म्हणून पशुपालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो. या व्यवसायात शेतकरी, पशुपालकांसह शेतमजुरांचेही प्रमाण मोठे आहे. त्यांच्या दैनंदिन दिनक्रमाचा विचार केल्यास ते सकाळी नऊपूर्वी कामासाठी शेतात जातात. पशुपालनाद्वारे मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या उत्पन्नात वाढ करणारे महत्त्वाचे घटक असले तरी शेतीकाम व मजुरी हेही त्यांच्यासाठी तितकेच महत्त्वाचे आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यांची वेळ सकाळी नऊनंतरची असल्याने त्यांच्या पशुधनावरील उपचारासाठी त्यांना शेतकाम व मजुरी बुडवून थांबावे लागत होते. त्याचा त्यांच्या अर्थार्जनावर परिणाम होत होता. शिवाय आरोग्य सेवेला आलेल्या मर्यादेचा राज्याच्या पशुजन्य उत्पादनालाही बसल्याचे दिसते. २०२४-२५ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेत पशुजन्य उत्पादनाचा वाटा केवळ २.८ टक्के इतका आहे. इतर राज्यांच्या तुलनेत राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता कमी असून त्यामागे पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या वेळेतील बदल हे कारण असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वेळेत बदल करण्याचा आदेश राज्य सरकारने २८ फेब्रुवारी रोजी काढला आहे.

**या सूचनांच्या काटेकोर अंमलबजावणीचे आदेश**

कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त आकस्मिक प्रसंगी पशुपालकांना २४ तास पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील. तसेच दुपारच्या मधल्या सत्रात दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावांत योजनांविषयक प्रचार, प्रसिद्धी, प्रशिक्षण, मार्गदर्शन व तांत्रिक कामकाज करावे. कार्यालय प्रमुख व कर्मचाऱ्यांनी आठवड्यातून एकदा कार्यक्षेत्रातील गावात किमान एकदा भेट द्यावी. गावात भेटीला जाण्यापूर्वी त्याची सूचना द्यावी, भ्रमणध्वनी क्रमांक दवाखान्याच्या दर्शनी भागी लावावा. ग्रामसभेला उपस्थित राहून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या योजनांची माहिती द्यावी, असे आदेश राज्याच्या पूशसंवर्धन विभागाने काढले आहेत.

### चायनीज खाद्यपदार्थांच्या...

अन्नाबाबत प्रश्न विचारले. तसेच, अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडे आवश्यक कारवाईसाठी मनुष्यबळ तसेच योग्य यंत्रणा नसल्याचा मुद्दा मांडला.

यावेळी विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना झिरवळ म्हणाले, प्रशासनाकडून १९७ नवीन अधिकाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात तपासणी मोहिमेला गती येईल. तसेच, प्रत्येक विभागात प्रयोगशाळा सुरू करण्याची सरकारची भूमिका आहे. त्यापैकी पुणे आणि नाशिक येथील प्रयोगशाळा अंतिम टप्प्यात असून लवकरच त्या पूर्ण क्षमतेने सुरू केल्या जातील. तसेच, खासगी प्रयोगशाळांच्या सेवाही घेतल्या जातील. दरम्यान, नागरिकांनी अन्न आणि औषधांसंदर्भात तक्रारीसाठी १८००-२२२-३६५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले होते. परंतु, या नंबरवर फोन करून काहीच होत नाही, असे सांगत भाजपच्या योगेश सागर यांनी या व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी केली.